Majlgaon-32

**पहा** :-1.महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्र. एलएनडी 1071/18373 36-अ/2 दिनांक 9/9/1971.

2.शासन महसलू व वन विभाग परिपत्रक क्र. एलएनडी 1091/713/प्र.क्र59/ज-1दि 28/6/99.

3.शासन महसलू व वन विभाग (शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे ) नियम 1071 ला राजपत्र एलएनडी/1083/16097 /प्र.क्र. 9/ज-1 दिनांक 11/10/2000 नुसार केलेली सूधारणा.

4.शासन महसलू व वन विभाग निर्णय क्र. एलआरएफ /1091//प्र. क्र.85/ज-1दि20/7/1992

5.शासन महसलू व वन विभाग निर्णय क्र.जमीन-10/2005/प्रक्र.38/ज-1दिनांक 7/3/2006अन्वये अगावू ताबा.

6.उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई याचे पत्रक क्र 20111/जमा/कावी/956 दिनांक 17/6/2011

क्र.2011/मशाका/जमा-1/त.बा./कावी/964
जिल्हाधिकारी कार्यालय बीड
दिनांक 2/8/2011

**आदेश**

ज्या अर्थी उप विभागीय अधिकारी बीड यांना त्याचे पत्र क्र 2011/जमा/कावी/956 दिनांक 17/6/2011 अन्वये शासकीय गायरान जमीन मधून तालूका माजलगाव जि. बीड यांच्या अधिपत्याखालील तलाठी कार्यालय व निवासस्थानासाठी तलाठी सजा पिंपरीखुर्द, सिमरीपारगाव, हरकिनिमागाव ,टाकरवण व वारोळा येथे शासकीय जमीन देणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

त्याअर्थी तहसलिदार माजलगाव जि. बीड यांना वरील तलाठी सजाच्या कार्यालय व निवास स्थानासाठी संदर्भ क्र 1 ते 5 व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 20 व 31आणि महाराष्ट्र जमीन महसूल ( सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे ) नियम 1971 चे कलम 5 व 6 च्या तरतूदीस आधिन राहून भोगाधिकारी मूल्य रहीत व जमीन महसूल मूक्त जमीन खालील गावातील शासकीय जमीन स.न.,क्षेत्र पुढील चतू:सिमा प्रमाणे जमीन मंजूर करुन हस्तांतरण करण्यास आदेशीत करीत आहे.

| अ.क्र | तालूका | गाव | शासकीय जमीनीचा स.न. /ग.न | मंजूरीचे क्षेत्र चौरस फुट | मंजूर जागेची चतू:सिमा |
|---|---|---|---|---|---|
| 1. | माजलगाव | टाकरवण | 274 | 50x50 | पूर्वेस :- रस्ता<br>पश्चिमेस :- बलभीम श्रीरंग गरड<br>दक्षिणेस :- गायरान शिल्लक जमीन<br>उत्तरेस :- आरोग्य खाते वसाहत. |
| 2. | | वारोळा | 193 | 40x50 | पूर्वेस :- झोपडपटटी<br>पश्चिमेस :- रस्ता<br>दक्षिणेस :- रस्ता<br>उत्तरेस :- बांधकाम |
| 3. | | सिमरी पारगाव | 137 | 50x50 | पूर्वेस :- खुली जागा<br>पश्चिमेस :- खुली जागा<br>दक्षिणेस :- रस्ता व शाळा<br>उत्तरेस :- नदी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4. | | हरकी निमागाव | 2 | 50x50 | पूर्वेस :- जिल्हा परीषदेची शाळा<br>पश्चिमेस :- सरकारी रस्ता<br>दक्षिणेस :- नाला<br>उत्तरेस :- रामभाऊ लक्ष्मण शिंदे |
| 5. | | पिंपरी खुर्द | 134 | 50x50 | पूर्वेस :- इनामी जमीन<br>पश्चिमेस :- रस्ता<br>दक्षिणेस :- ढाळा<br>उत्तरेस :- सदन जागा |

अटी/शर्ती

1. ज्या कामासाठी जमीनीचे विनियोजन करण्यात आले आहे. त्याचा वापर त्याच कारणासाठी केला पाहिजे. त्या जमीनीचे हस्तांतरण,विक्री,लीजवर,खाजगी व्यक्तीस अथवा अन्य खात्यास करता येणार नाही.

स्वाक्षरीत-
जिल्हाधिकारी बीड

प्रतिलिपी,

1. मा. अप्पर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग (महसूल) मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर.
2. मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
3. उप विभागीय अधिकारी अंबाजोगाई यांना माहितीस्तव देण्यात येते.
4. कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
5. तहसिलदार माजलगाव यांना देऊन कळविण्यात येते की, तालूका निरीक्षक भूमि अभिलेख माजलगाव यांचे कडून या जमीनीची मोजणी करुन घ्यावी .
6. अधिक्षक भूमि अभिलेख बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
7. तालूका निरिक्षक भूमि अभिलेख माजलगाव यांना देऊन कळविण्यात येते की.जमीनीची मोजणी करुन मोजणी नकाशाची प्रत तहसीलदार माजलगाव यांना व या कार्यालयास सादर करावे.

जिल्हाधिकारी बीड करिता.

पहा :- महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय

क्रमांक एलएनडी ४९८३/४८८६५-सोळार-२४७६

ग-५ दिनांक १८-९-८४

30

## आदेश

क्र. ७६ आरबीटीएन एलएनडी

१-२८/८०

जिल्हाधिकारी कार्यालय बीड

दिनांक ~~ऑगस्ट १९८५~~ २-९-८५

सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगांव यांनी त्यांचे पत्र क्रमांक जमीन-सिरसाळा/२१०९/७९-८० दिनांक १८-७-८० अन्वये दुय्यम बाजारपेठ सिरसाळा साठी मौ. सिरसाळा येथील गायरान सर्वे नंबर २४३ मधून २० एकर शासकीय जमिनीची मागणी केली.

6

ISSUED

Date, 2.9.85

Despatch Clerk

Collectorate. Bee[d]

(८)

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांनी संदर्भीय दिनांक १८-९-८४ चे परिच्छेद ३ मधील आदेशात केल्या प्रमाणे भोगाधिकार मूल्य प्रति एकरी रुपये ८८०/- या दराने २० एकरचे १७,६००/- रुपये स्टेट बँक ऑफ हैद्राबाद चलनाद्वारे ब्रँच माजलगांव येथे दिनांक २५-९-८४ रोजी जमा केले आहेत तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ चे नियम ४२ प्रमाणे नमुना नंबर अ मधील करारनामा लिहून दिला आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची

विल्हेवाट करणे) नियम १९७१ चे नियम ३१ अन्वये

मी, सुधाकर. वि. जोशी, जिल्हाधिकारी, बीड याद्वारे दुरवन बाजारपेठ शिरसाळा सजा गायरान सर्वे नंबर २४३ मधून २० एकर [८-०९.३७] हेक्टर जमीन मंजूरीचे आदेश पुढील अटींना व शर्तींना अधीन राहून देत आहे :-

अटी :- (१) जमीन घेणारा जमीन ताब्यात घेतल्याचे तारखेपासून दोन वर्षाचे कालावधीत ज्या प्रयोजनासाठी ती देण्यात आली त्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करील.

(२) जमीन घेणारा हा भोगवटदार वर्ग दोन म्हणून जमीन धारण करील.

(३) जमीन घेणारा हा, वि.सो.क्र. ३६८०/तसेच वेळोवेळी ठरविण्यात येईल त्या प्रमाणे त्या क्षेत्रात आकारण्यात येत असलेली अकृषिक आकारणीची रक्कम नियमितपणे देईल.

(४) जमिनीतील सर्व खाणी व खनिजपदार्थ तसेच दगडखाणी यावरील शासनाने राखून ठेवलेल्या अधिकारास अधीन राहून जमीन देण्यात येईल आणि शासनास, खाणकाम करण्याच्या व उत्खनन शोधण्याच्या प्रयोजनार्थ, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मध्ये तरतूद केले प्रमाणे त्या ठिकाणी प्रवेश करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य असेल

३०३

(५) जर जमिनीची किंवा तिच्या कोणत्याही भागाची कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी आणी शासन शासनाला आवश्यकता असेल तर, ती जमीन परत घेण्यात येणार असेल त्या जमिनीसाठी किंवा तिच्या अशा कोणत्याही भागासाठी जमीन घेणा-याने दिलेल्या, जमिनीच्या किंमती इतकी भरपाई दिल्यानंतर आणी जमिनीवर कोणतेही बांधकाम असल्यास कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी निर्धारित केलेला, इमारतीचा किंवा बांधकामाचा खर्च दिल्यानंतर शासनाकडून जमीन परत घेण्यात येईल.

(६) हे आदेश काढण्यात आलेल्या तारखेपासून दोन वर्षाच्या कालावधीत आत जमिनीवर दर चौ. मिटर जमिनीवर १ झाड या प्रमाणे योग्य जातीची झाडे लावणे व त्यांचे नेहमी करीता परिरक्षण करणे बंधनकारक राहील.

(७) जमीन घेणारा प्रस्तुत जमीन, ~~जमीन~~ किंवा जमिनीचा भाग जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय गहाण, किंवा विक्री करणार नाही.

वरील शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जमिनीचे प्रदान रद्द करण्यात येईल आणी कोणतीही भरपाई न देता शासन ती जमीन आपल्याकडे परत घेईल.

sd.
(सुधाकर वि. जोशी)
जिल्हाधिकारी, [illegible]

26-8-85

प्रतिलिपी :-
(१) अवर सचिव, महसूल व वन विभाग —